# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# विशेष बातमीपत्र
# कोरोना महाराष्ट्र
# सकाळी 10 वाजून 10 मि

**दिनांकः 31.07.2021** **वारः शनिवार**

---

**आधी एक विनंती....**

**18 वर्षांवरील सर्वांसाठी कोरोना प्रतिबंधक लसीकरण मोहीम सुरू झाली आहे. लसीकरण करून घ्या. नंतरही काळजी घ्या. मुखपट्टी वापरा, सुरक्षित अंतर राखा, हात, चेहरा वारंवार स्वच्छ धुवा. कोविड प्रतिबंधासाठीचे नवे निर्बंध पाळा. विनाकारण घराबाहेर पडून गावात गर्दी करू नका. कोविड-19 बद्दल काही प्रश्न असतील तर 011-23 978 046 आणि 1075 या राष्ट्रीय; तसंच 020-26 127 394 या महाराष्ट्रासाठीच्या हेल्पलाईन क्रमांकांवर संपर्क साधा.**

---

1. बालकांसाठी कोविड प्रतिबंधक लस लवकरात लवकर विकसित करण्याची उपराष्ट्रपती एम. वेन्कैय्या नायडूंची वैज्ञानिकांना विनंती
2. ठाणे जिल्ह्यातील कोविड योद्ध्यांचा राज्यपालांच्या हस्ते पुरस्कार देऊन सन्मान
3. राज्यात काल 7 हजार 431 कोरोना रुग्ण बरे झाले, तर 6 हजार 600 नवीन कोरोनाबाधित आणि
4. नाशिक जिल्ह्यात कोरोना रुग्णांना गृहविलगीकरणाची परवानगी न देता, थेट रुग्णालयात दाखल करून घेण्याच्या सूचना

---

**उपराष्ट्रपती**

उपराष्ट्रपती एम. वेन्कैय्या नायडू यांनी, बालकांसाठी कोविड प्रतिबंधक लस लवकरात लवकर विकसित करण्याची विनंती वैज्ञानिक जगताला केली आहे. भारत बायोटेक कंपनीच्या हैद्राबाद इथल्या जीनॉम व्हॅली प्रकल्पाला काल त्यांनी भेट दिली. त्यानंतर संस्थेच्या वैज्ञानिक आणि कर्मचाऱ्यांशी संवाद साधताना ते बोलत होते. कोरोना संसर्गापासून वाचण्यासाठी लसीकरणाशिवाय पर्याय नसून, आपल्याला आणि आपल्या जवळच्यांना संरक्षण देण्याचा हाच एक मार्ग आहे असं त्यांनी नमूद केलं. देशात आणि देशाबाहेरील लसीकरण मोहिमेत महत्वपूर्ण योगदान दिल्याबद्दल त्यांनी भारत बायोटेकची प्रशंसा केली.

**राज्यपाल-ठाणे सिटीझन्स प्राईड पुरस्कार**

राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्या हस्ते काल 'ठाणे सिटीझन्स प्राईड' पुरस्कार प्रदान करण्यात आले. ठाणे जिल्हाधिकारी आणि ठाणे महानगरपालिका यांच्या अंतर्गत कोविड कृती दलाच्या माध्यमातून कोरोना संसर्गाच्या काळात कार्य करणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना या पुरस्काराच्या माध्यमातून गौरवण्यात आलं. पोलीस महासंचालक विवेक फणसळकर, ठाण्याच्या अतिरिक्त जिल्हाधिकारी वैदेही रानडे, जिल्हा वैद्यकीय अधिकारी डॉक्टर कैलास पवार, यांच्यासह पोलीस, वैद्यकीय आणि अग्निशमन दलातील कर्मचाऱ्यांना हे पुरस्कार वितरीत करण्यात आले. कोरोना काळात समाजातल्या सर्व स्तरातील नागरिकांनी कर्तव्यापलीकडे जाऊन सेवाकार्य केल्यामुळे समाजातील

नकारात्मक चित्र बदललं, असं राज्यपाल याप्रसंगी बोलताना म्हणाले. कोरोनाच्या तिसऱ्या लाटेचा धोका लक्षात घेता सावधगिरी बाळगण्याबाबत जनजागृती करणं आवश्यक असल्याचंही राज्यपाल म्हणाले.

**राज्य-कोविड आकडेवारी**

राज्यात काल कोरोना बाधितांच्या संख्येपेक्षा बरे होणाऱ्या रुग्णांचं प्रमाण अधिक होतं. काल दिवसभरात राज्यात 7431 रुग्ण बरे झाले, तर 6600 नवीन बाधित आढळून आले. राज्यात काल 231 कोरोना बाधित रुग्णांच्या मृत्यूची नोंद झाली. साध्य राज्याच्या कोविड-19 आजारात मृत्युमुखी पडण्याचा दर 2 पूर्णांक 1 दशांश टक्के असून, कोविड मुक्त होण्याचा दर 96 पूर्णांक 61 टक्के आहे.

**तिसरी लाट-नियोजन-वळसे पाटील**

पुणे जिल्ह्यातील कोरोना परिस्थिती आणि उपाय योजनांबाबत काल पुण्यात राज्याचे गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली काल पुण्यात आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीत, कोविड 19 च्या तिसऱ्या लाटेची शक्यता गृहीत धरून, उपाय योजना करण्याबाबत त्यांनी सूचना दिल्या. संभाव्य तिसऱ्या लाटेचा विचार करता पहिला डोस घेतलेल्या नागरिकांना, योग्य नियोजन करून प्राधान्याने लशीची दुसरी मात्र देण्याची सूचना त्यांनी दिली. तसंच, पुणे आणि पिंपरी-चिंचवड महानगरातील निर्बंधामध्ये काही प्रमाणात शिथिलता देण्यासंदर्भात शासनाकडून दिल्या जाणाऱ्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे कार्यवाही करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या. ग्रामीण भागातील लोकसंख्या लक्षात घेऊन त्यानुसार वैद्यकीय मनुष्यबळ वाढवण्याचे, तसंच औद्योगिक क्षेत्रात कामगारांसाठी लसीकरण कक्षा स्थापन करण्याचे निर्देश वळसे पाटील यांनी यावेळी दिले. या बैठकीला विधापरिषदेच्या उपसभापती डॉक्टर नीलम गोऱ्हे, महापौर माई ढोरे, जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा निर्मलाताई पानसरे, आणि अन्य पदाधिकारी उपस्थित होते. तिसऱ्या लाटेसाठी नियोजन करताना कोरोनामुक्त झालेल्या गावांच्या अनुभवाचा फायदा करून घेण्यात यावा असं गोऱ्हे यांनी यावेळी सुचवलं.

**नवी मुंबई-पॉझीटीव्ह स्टोरी**

नवी मुंबईतल्या वाशी इथल्या मराठी साहित्य संस्कृती आणि कला मंडळ आणि प्राध्यापक माणिकराव कीर्तने वाचनालय या संस्थांनी कोविड संसर्गाच्या काळात अनेक ठिकाणच्या वंचित घटकांतील नागरिकांना मदतीचा हात दिला. तुर्भे इथल्या देहविक्रय करणाऱ्या 100 महिलांना तसंच कर्जत तालुक्यातील 300 आदिवासी बांधवांना या संस्थांनी अन्न पदार्थ आणि कपड्यांचं वाटप केलं आहे. या कार्याबाबत अधिक माहिती देताना संस्थेचे अध्यक्ष सीताराम कुलकर्णी सांगतात....

**दोन हजार कुटुंबांना आम्ही किराणा कीट देऊ शकलो. त्यासोबतच या भागात मोठ्या प्रमाणात अंधश्रद्धा असल्यानं, आदिवासी महिलांना मासिक पाळी व महिलांचे आरोग्य यासंदर्भात काळजी घेण्यासाठी प्रवृत्त करावे, म्हणून आम्ही मासिक पाळीच्या संधर्भात एक जन-जागृती मोहिम राबविली. यासोबतच आम्ही यंग फाऊंडेशनच्या माध्यमातून जवळपास 20 हजार सॅनिटरी पॅडस् आम्ही महिलांना देऊ शकलो. या पॅड्स साठी आम्हाला समाजातील अनेक संस्था- संघटनांनी मदत केली. यासोबतच लसिकरन व्हावं, कोविडच्या संधर्भात विविध समज-गैरसमह जे आहेत ते दूर व्हावेत, कोविड काळात आवश्यक ती काळजी घ्यावी या संधर्भातील ही जन-जागृती केली.**

**नाशिक- भुजबळ**

कोरोना रुग्णांना गृहविलगीकरणाला परवानगी न देता, थेट रुग्णालयात दाखल करून घेण्याच्या सूचना नाशिक जिल्ह्याचे संपर्कमंत्री छगन भुजबळ यांनी काल दिल्या. भुजबळ यांच्या अध्यक्षतेखाली काल येवला आणि निफाड तालुक्यातील कोरोना सद्यस्थिती, उपाययोजना आणि लसीकरणाबाबत आढावा बैठक झाली, त्यावेळी ते बोलत होते.

जिल्ह्यातील ऑक्सिजन प्लान्ट त्वरित कार्यान्वित करण्यासाठी तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचनाही यावेळी त्यांनी दिल्या. कोरोनामृतांचे अंत्यविधी आणि अन्य धार्मिक कार्यक्रम करणाऱ्या निफाड तालुक्यातील युवकांचा भुजबळ यांनी यावेळी गौरव केला.

निर्बंधांच्या शिथीलतेबाबत, शासनाच्या कृती दलामार्फत अर्थात टास्क फोर्स मार्फत घेण्यात येणारा निर्णय अंतिम असेल, त्यानुसारच जिल्ह्यात नियम लागू करण्यात येतील. सद्यस्थितीत जिल्ह्यात लागू असलेल्या निर्बंधांमध्ये कोणतेही बदल करण्यात आले नसून, सर्व निर्बंध कायम ठेवण्यात आले असल्याचं भुजबळ यांनी यावेळी स्पष्ट केलं.

**वाशीम-शाळा**

वाशीम जिल्ह्यातल्या कोरोना मुक्त झालेल्या भागात शाळा सुरु करण्याचा उपक्रम शिक्षण विभाग राबवत आहे. मात्र, या उपक्रमाला जिल्ह्यात अत्यल्प प्रतिसाद दिसून येत आहे. जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील 275 पैकी केवळ 81 शाळा सुरु झाल्या असून, तिथे सरसरी उपस्थिती केवळ 30 टक्के इतकीच आहे.

दरम्यान, कोरोन संसर्गाच्या पार्श्वभूमीवर, वाशीम जिल्ह्यात लागू करण्यात निर्बंधांमुळं येत्या 2 ऑगस्ट रोजी साजरा करण्यात येणारा जिल्हास्तरीय लोकशाही दिन स्थगित करण्यात आल्याचं जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत कळवण्यात आलं आहे.

**अमरावती - हॉटेल व्यावसायिक मोर्चा**

अमरावती शहरातील हॉटेल व्यवसायिकांनी, आपल्या अनेक मागण्यांसाठी काल जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा नेला. शनिवार रविवार सहित हॉटेल्स सुरु ठेवण्यास परवानगी देण्यात यावी, हॉटेल सुरु ठेवण्याची वेळ 11 वाजेपर्यंत वाढवण्यात यावी या आणि अशा मागण्या यावेळी हॉटेल व्यावसायिकांनी केल्या. शहरात कोरोना रुग्णसंख्या कमी होत असताना शासनाने अजूनही निर्बंध तसंच ठेवल्याबद्दल आंदोलनकर्त्यांनी नाराजी नोंदवली.

**पुणे - जम्बो कोविड रुग्णालय**

पुण्यात शिवाजीनगर इथं सुरु करण्यात आलेले जम्बो कोविड केंद्र सुरु ठेवण्याबाबत लवकरच निर्णय घेण्यात येणार आहे. या केंद्रात कोरोनाबाधीतांना उपचारासाठी दाखल करून घेणे याआधीच बंद करण्यात आलं आहे. तसंच हे केंद्र चालवणाऱ्या कंपनीशी करण्यात आलेला करारही संपुष्टात आला आहे. मात्र, संभाव्य तिसऱ्या लाटेच्या पार्श्वभूमीवर हे केंद्र बंद करण्याच्या सूचना उपमुख्यमंत्री आणि जिल्ह्याचे संपर्कमंत्री अजित पवार यांनी दिल्या आहेत. त्यामुळं या रुग्णालयाचं स्ट्रक्चरल अडिट करून मगच हे केंद्र सुरु ठेवण्याबाबत निर्णय घेण्यात येईल अशी माहिती पुणे महापालिकेतील अतिरिक्त आयुक्त रवींद्र बिनवडे यांनी दिली आहे.

**स्वातंत्र्य दिन-निर्देश पालन**

येत्या 15 ऑगस्ट रोजी साजरा होणारा देशाचा 74 वा स्वातंत्र्य दिन साजरा करताना केंद्र शासनाच्या गृह मंत्रालय तसंच आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने दिलेल्या सूचनांचं काटेकोरपणे पालन करण्याची दक्षता घेण्याचे निर्देश राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागामार्फत देण्यात आले आहेत.

---

**या बरोबरच कोरोना महाराष्ट्र हे विशेष बातमीपत्र संपलं; नमस्कार.**